जाक्र/जिपप/साप्रवि/राग्रास्वअ/कावि- 79 /2018
पंचायत विभाग, जिल्हा परिषद, परभणी.
दिनांक :- 23 / 2 /2018

# जाहिर नोटीस

## अभ्यास दौऱ्यासाठी कोटेशन / दपत्रक मिळणे बाबत.

**विषय :- जिल्हा परिषदेच्या अभ्यास दौऱ्यासाठी लक्झरी बसचे कोटेशन / दरपत्रक सादर करणेबाबत.**
(वाहन + निवास + भोजन इ. सुविधेसह)

**संदर्भ** :- 1) मा.अवर सचिव, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.रागांप-2017/प्र.क्र.110/योजना-4 दिनांक :- 15/06/2017
2) मा.राज्य प्रकल्प संचालक, राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, पुणे यांचे पत्र क्र.रागांपंसअ/प्रशि./147/2017-18 दि.11/07/2017.
3) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांची मंजुर टिपणी दिनांक:- 23 / 02 /2018

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविण्यात येते की, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान सन 2017-18 अंतर्गत जिल्हा परिषद, परभणी अंतर्गत लोकप्रतिनिधी / अधिकारी / कर्मचारी (एकुण 40 प्रतिनिधीकरिता) जिल्हा बिड अंतर्गत पाणी फाऊँडेशन अंतर्गता गाव 1)मौ.खापरटोण, अबेजोगाई व 2)कुंबेफळ ता.केज मार्गे नाशिक विभागातील अहमदनगर जिल्ह्यातील 3)राळेगनसिध्दि, 4)हिवरे बाजार, तसेच नाशिक जिल्ह्यातील 5)बेळगांव ढगा, 6)त्रंबकेश्वर, 7)मौ.लाखलगांव मार्गे औरंगाबाद जिल्ह्यातील 8)ग्रामपंचायत पाटोदा या उत्कृष्ट व नाविन्यपुर्ण कामकाज केलेल्या ग्रामपंचायतींचा अभ्यास करणेकामी 4 दिवसीय (3 रात्री, व 4 दिवस) अभ्यास दौऱ्याचे आयोजन करावयाचे आहे.

सदर अभ्यास दौऱ्याकरिता मान्यताकृत ट्रॅव्हल्स / यात्रा कंपनीकडुन 40 व्यक्तींसाठी लक्झरी बसचे (वाहन + निवास + भोजन इ.सुविधेसह) कोटेशन / दरपत्रक मागविण्यात येत आहे.

<u>कोटेशन / दरपत्रक सादर करणेबाबत सुचना खालीलप्रमाणे.</u>

1) ट्रॅव्हल्स कंपनी मान्यताकृत असावी.
2) उक्त अभ्यास दौरा अंदाजित 1200 ते 1400 कि.मी. चा असेल त्यानुसार कोटेशन सादर करावे.
3) अभ्यास दौऱ्यात 40 जिल्हा परिषद लोकप्रतिनिधी / अधिकारी / कर्मचारींच्या समावेश राहणार आहे.
4) कोटेशन वातानुकुलित वाहन + नॉन एसी निवास + 1 वेळा नाश्ता, 2 वेळा चहा, 2 वेळा भोजन या प्रकारे सादर करण्यात यावे. (निवास : एका रुममध्ये 2 व्यक्ती व भोजन दर्जा उच्च प्रतीचा असावा.)
5) कोटेशन / दरपत्रक उप मुख्य कार्यकारी अधिकारी ग्रा.पं.), जिल्हा परिषद, परभणी यांचे नावे ग्रामपंचायत विभागात समक्ष अथवा पोष्टाने नोटीस प्रसिध्द झालेपासुन 8 दिवसांत सादर करावे, मुदतीत प्राप्त न झालेले अथवा इतर कुठल्याही कारणाने विलंबाने प्राप्त झालेल्या कोटेशन / दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी
6) प्राप्त कोटेशन पैकी ज्या ट्रॅव्हल्स कंपनीचे कोटेशन अभ्यास दौऱ्यासाठी अंतिम केले जाईल, त्या ट्रॅव्हल्स / यात्रा कंपनीने करार करतेवेळी मान्यता / परवाना, अनुभव व अनुषंगिक कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे.
7) अभ्यास दौऱ्यामध्ये टोल, पार्कींग, पोलिस एन्ट्री व इतर तत्सम चार्जेस यात्रा कंपनीने अदा करावयाचे आहे.
8) सदर अभ्यास दौरा नैसर्गिक काराणास्त वा इतर कारणास्तव नाशिक विभागाव्यतिरिक्त इतरत्र आयोजित करण्याचा, अंशत: बदल करण्याचा किंवा पुर्ण:ता अभ्यास दौरा रद्द करण्याचे अधिकार या कार्यालयाकडे राखुन ठेवण्यात येत आहे

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, परभणी